| | | |
|---|---|---|
| | **P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad**<br>**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**<br>**Premlok Park Chinchwad,**<br>**Maharashtra - 411033** | |

**प्रेसनोट दिनांक - ०३/१०/२०२४**

**“घटस्थापना व नवरात्रौत्सव” “ बंदोबस्त ”**

दिनांक ०३/१०/२०२४ ते १२/१०/२०२४ या दरम्यान साजरे होणारी **घटस्थापना व नवरात्रौत्सवचे** अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातर्फे जय्यत तयारी करणेत आली आहे.

सदरचा घटस्थापना व नवरात्रौत्सव मोठया उत्साहात व शांततेने पार पाडावा व कोणताही कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निमार्ण होऊ नये म्हणुन सदर कालावधीत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत पोलीसांचा मोठा फौजफाटा तैनात असणार आहे. ०१ पोलीस सह आयुक्त, ०१ अपर पोलीस आयुक्त, ०६ पोलीस उप आयुक्त, ९ सहायक पोलीस आयुक्त, ४८ पोलीस निरीक्षक, २१० सपोनि/ पोउपनि, २०५० पोलीस अंमलदार, ५०० होमगार्ड, ०१ एसआरपीएफ कंपनी, ०२ बीडीडीएस पथक, ०५ आरसीपी, १७ स्ट्रायकिंग एवढा बंदोबस्त तसेच सकाळी व सायंकाळी महिला छेडछेडा होवू नये यासाठी ३४ दामीनी पथके कार्यरत राहणार आहेत.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व पोलीस स्टेशन यांनी सर्व मंडळांच्या व शांतता समितीच्या बैठका घेतले असुन सदर बैठकामध्ये नवरात्रौत्सव हा उत्साहाने व कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही त्या दृष्टीने सर्व सुचना देणेत आलेल्या आहेत. सर्व नागरीकांनी व मंडळाचे सदस्य, कार्यकर्त्यांनी सदर सुचनांचे पालन करावे याबाबत पोलीस आयुक्तांनी आव्हान केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पिंपरी चिंचवड आयुक्तालय**